# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



० ७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/४९३/२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०७/०८/२०१८

## "पोलीस ठाणे मोहाडी व कारधा अंतर्गत अंधश्रध्दा निमुर्लन व्याख्यान व फिरते पोलीस स्टेशन कॅम्प"

**भंडारा:—** जिल्हा पोलीस अधिक्षक, श्रीमती विनीता साहू यांचे नाविन्यपुर्ण संकल्पनेतुन भंडारा जिल्हयात शहरी व ग्रामीण भागात दुरक्षेत्रापर्यत विविध ठिकाणी जणतेच्या समस्या सोडविण्या करीता व लोंकामध्ये पोलीसाप्रती विश्वासाची भावना निमार्ण करून, कायदयाप्रती आदर व शासन निर्णयासंबधी माहीती जनतेस पोहचविण्याचे उद्देशाने तसेच लोकांमध्ये आपसात किरकोळ कारणावरून वादविवाद, तंटे होत असल्याने एकमेकाबद्दल एकोप्याची भावणा निर्माण होत नाही, त्याकरीता **''फिरते पोलीस स्टेशन''** भंडारा जिल्हयात यशस्वीपणे राबविण्यात येत असुन भंडारा पोलीस **''आप के साथ भी, आप के पास भी ''** चाही समावेश करण्यात आला आहे. सदरचे आठवडयात जादुटोना कायदयाचे अनुषंगाने अंधश्रध्दा निर्मुलन व्याख्यान उपक्रमाचा विशेष समावेश करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन कारधा अंर्तगत ग्राम गिरोला येथे दिनांक ०५/०८/२०१८ रोज रविवार ला फिरते पोलीस स्टेशन कॅम्प व अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम घेण्यात आले. ग्राम गिरोला येथे घेण्यात आलेल्या कॅम्पमध्ये पोलीस निरीक्षक, गजानन कंकाळे, ठाणेदार पोलीस स्टेशन कारधा व त्याचे सहकारी अधिकारी, कर्मचारी यांनी ग्राम गिरोला येथे तसेच पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत ग्राम रोहणा येथील ग्रामपंचायत आवारात दिनांक ०६/०८/२०१८ ला पोलीस निरीक्षक, शिवाजी कदम, ठाणेदार पोलीस ठाणे मोहाडी यांनी त्यांचे सहकारी पोलीस अधिकारी,कर्मचारी यांचेसह ग्राम रोहणा अशा दोन्ही ठिकाणी गावातील पोलीस पाटील व महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, पोलीस मित्र, ग्राम सुरक्षा दल सदस्य, महिला दक्षता समिती सदस्या, शाळकरी विदयार्थी, विदयार्थीनी व गावकरी असे ग्राम गिरोली येथे १५० ते १७० लोक व ग्राम रोहणा येथे २५० लोक उपस्थित होते. कॅम्प दरम्यान गावात एकमेकांबद्दल एकोप्याची भावना निर्माण व्हावी त्याकरीता पोलीस स्टेशन आपले दारी, यामधुन कॅम्प आयोजीत करुन प्रत्यक्ष जनतेसोबत चर्चा विमर्स करुन वाद संपृष्टात आणने. जनतेकडील असलेल्या तक्रारी त्वरीत निपटारा होण्याबाबत, पोलीसमित्र यांचे प्रतिसाद, महिला अत्याचार विषयक कायदयाचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चोरी, घरफोडी, बॅकींग फसवणुक, विद्यार्थ्याचे स्पर्धा परीक्षा, वाहन ध्वनी प्रदुषण, सोशल मिडीया पासुन होणारे फायदे व तोटे, तसेच अवैध धंदयावर प्रतिबंध होण्याबाबत चर्चा करून त्यावर मार्गदर्शन करून, संत गाडगे महाराज विचारक व अंधश्रध्दा निमुर्लन समिती अमरावती येथिल प्रबोधनकार श्री. श्रीकृष्ण

धोटे यांनी जादुटोना कायदा व समाजात अंधश्रध्दे मुळे होणारे वाईट परिनाम होवुन भोंदु बाबा लोकांना कसे फसवितात याबाबत लोकांना मार्गदर्शन करून चित्रपट दाखवुन जनजागृती करण्यात आली.

सदर फिरते पोलीस स्टेशन कॅम्प व अंधश्रध्दा निर्मुलन व्याख्यानास जनतेकडुन मोठया प्रमाणावर प्रतिसादर मिळुन आला असुन, कॅम्प दरम्यान देण्यात येत असलेल्या मार्गदर्शनाचे अवलंब करून सदगुनांची दैनंदिन जिवनात अंमलबाजावनी करावी असे भंडारा पोलीसांद्वारे जनतेश आवाहन करण्यात येत आहे.

(जितेद्रं के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.